Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भंडारा जिल्हयातील लोकसंख्येच्या पोषण घनतेचा भौगोलिक अभ्यास

**अश्विन सुरेश खांडेकर**
सहाय्यक प्राध्यापक,भूगोल विभाग
मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय,
सालेकसा.जि.गोंदिया.

**सारांश**

एखादया प्रदेशातील कार्यक्षम लोकसंख्या ही क्षेत्राच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावते. भौगोलिक दृष्टिकोनातून भंडारा जिल्हयातील लोकसंख्येच्या पोषण घनतेचा अभ्यास प्रस्तुत श्शोध निबंधात करण्यात आला आहे. २०११ या वर्षातील लोकसंख्या आणि जिल्हयातील २०१७ चे लागवडी खालील क्षेत्र या दोन घटकांना विचारात घेता असे आढळून आले आहे की, २०११ मध्ये अभ्यास क्षेत्रात भंडारा तालुक्यात सर्वाधिक पोषण घनता ७६२ व्यक्ती प्रती चौ.कि.मी. आहे. तर सर्वात कमी पोषण घनता लाखांदूर तालुक्यात ३०३ व्यक्ती प्रती चौ.कि.मी. आढळून येते. भंडारा जिल्हयातील लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून त्या तुलनेत लागवडी खालील क्षेत्रात मात्र घट दिसून येते.

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाची आर्थिक पायाभरणी ही त्या देशातील निकोप,कार्यक्षम व सुदृढ लोकसंख्येवर अवलंबून असते. यासाठी उत्तम आरोग्य असणे आवश्यक आहे. हे देशाच्या सर्वांगिण विकासाचे द्योतक असून उपलब्ध सोयी सुविधा, शेतातून निघणारे उत्पादन, संतुलित आहार या व अशा अनेक घटकावर आधारीत आहे. वर्तमानात शेतातील विविध पिकांचे क्षेत्र व उत्पादनाचे प्रमाण दिवसेंदिवस बदलतांना दिसते. भारतात झालेल्या आहार सर्वेक्षणावरून असे लक्षात आले की, भारतातील लोकसंख्येचा अधिक समूह जो निम्न आर्थिक स्तरावरील आहे, अशा लोकांच्या आहाराचा दर्जा हा कमी असतो. दैनिक आहारात ऊर्जेची कमतरता याशिवाय प्रथिने, स्निग्धपदार्थ, कर्बोदके यांचे प्रमाण कमी असल्याने संतुलित पोषक आहार न मिळाल्यामुळे शारीरिक अकार्यक्षमता, कुपोषण, शारीरिक दुर्बलता व विभिन्न रोगांचा सामना लोकांना करावा लागतो. याचा परिणाम शरीरावर होतो.

प्रस्तुत शोध निबंधात भंडारा जिल्हयातील लोकसंख्येच्या पोषण घनतेचा अभ्यास करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विदर्भातील भंडारा जिल्हा असून **तलावांचा जिल्हा** म्हणूनही ओळख आहे. तुमसर, मोहाडी, भंडारा, साकोली, लाखनी, पवनी व लाखांदूर या तालुक्यांचा समावेश भंडारा जिल्हयात केला जातो. पवनी तालुक्यातील गोसे या गावाजवळ वैनगंगा नदीवर धरण बांधण्यात आले आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी २०११ व २०१७ या वर्षांना विचारात घेवून जिल्हयाची वाढणारी लोकसंख्या, अन्नधान्याचे उत्पादन आणि लागवडीखालील जमिन याबाबींचा समावेश करुन लोकसंख्येच्या पोषण घनतेचा अभ्यास केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी महाराष्ट्राच्या भंडारा जिल्हयाची निवड केली आहे. भंडारा जिल्हा हा २०° ३९' व २१° १७' उत्तर अक्षांश आणि ७९° २७' व ८०° ४२' पूर्व रेखांश या दरम्यान पसरलेला असून वैनगंगेच्या खोऱ्यात आहे. भंडारा जिल्हयाचे क्षेत्रफळ ३७१७ चौरस कि.मी. असून महाराष्ट्र राज्याच्या १.२१ टक्के एवढे आहे.

जलसिंचनाच्या सोयी शेतीच्या विकासाला पूरक आहेत. अभ्यास क्षेत्रातील प्रमुख पीक तांदूळ असून सरासरी पर्जन्य १३३०.२० मिलिमिटर इतके आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भंडारा जिल्हयाची एकुण लोकसंख्या १२००३३४ एवढी आहे. साक्षरता ८३.८ टक्के असून ८१ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात तर १९ टक्के लोकसंख्या नागरी भागात दिसून येते. सर्वाधिक लोकसंख्या भंडारा तालुक्यात आहे. लागवडी खालील क्षेत्र २७१२०६.५८ हेक्टर एवढे आहे. मानवी आरोग्याच्या संदर्भातील सोयी सुविधा जिल्हयात आहे

भंडारा जिल्हा मुंबई ते कोलकाता या राष्ट्रीय महामार्गावर (सहा) आहे. जिल्हयाचे सरासरी पर्जन्यमान १३२०.०० मि.मि. आहे. समुद्रसपाटीपासून दूर असल्याने येथील हवामान विषम स्वरुपाचे आहे.

**उद्दिष्टये :-**

या शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्‍चित करण्यात आली आहेत.

१) भंडारा जिल्हयातील लोकसंख्येच्या बदलाचा अभ्यास करणे.

२) लागवडीखालील क्षेत्राला माहित करुन घेणे.

३) लोकसंख्येच्या पोषण घनतेला स्पष्ट करुन उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती व माहिती संकलन :-**

द्वितियक स्वरुपाच्या माहितीवर प्रस्तुत शोधनिबंध आधारित असून या आकडेवारीचे संकलन भंडारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन आणि भंडारा जिल्हा पुस्तिका याद्वारे करण्यात आले आहे. २०११ या वर्षातील लोकसंख्या आणि २०१७ चे लागवडीखालील क्षेत्र याविषयीचे आकडे तालुकानिहाय गोळा करुन पोषण घनतेच्या सुत्राद्वारे छायापध्दती ने नकाशात दर्शविले आहे.

**विषय विवेचन :-**

खालील प्रमाणे विषयाचे विस्तृतपणे विश्लेषण केले आहे.

**भंडारा जिल्हयातील पोषण घनता :-**

लोकसंख्या एखादया प्रदेशातील विकासाचे सुचक असते. अभ्यासक्षेत्रातील शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीच्या विकासात सदृढ लोकसंख्या महत्वपूर्ण असून आहार आणि अपेक्षित पोषण घटकांची उपलब्धता राष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने शेतीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. प्रदेशातील लोकसंख्या

त्या भूमीवर अवलंबून असून लोकांच्या अन्नधान्याची गरज ही भूमी किती प्रमाणात पूर्ण करते? याचा अभ्यास महत्वपूर्ण आहे.

दिवसेंदिवस लोकसंख्या ही वाढत आहे. त्या तुलनेत अन्नधान्याचे उत्पादन पूरेसे आढळून येत नाही. आजही ग्रामीण भाग प्रमाणित पोषण आहाराच्या समस्येनी ग्रस्त दिसून येतो.

अनेक तंत्राच्या माध्यमातून भूगोल वेत्त्यांनी जमिनीची उत्पादक क्षमता सांगितले आहे.एखादया प्रदेशातील लोकसंख्या व त्याच प्रदेशातील लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र या घटकांच्या आधारावर पोषण घनता काढली जाते. प्रदेशातील एकूण लोकसंख्या व एकूण पिकाखालील क्षेत्र यामधील गुणोत्तराला दर चौरस कि.मी. मध्ये दर्शविले जाते. (चंदना १९३६) पोषण घनतेचे सुत्र खालीलप्रमाणे आहे.

$$\text{पोषण घनता} = \frac{\text{अ. प्रदेशातील एकूण लोकसंख्या}}{\text{अ. प्रदेशातील एकूण लागवडी खालील क्षेत्र}}$$

खालील सारणीत भंडारा जिल्हयातील पोषण घनता दर्शविली आहे.

| अ.क्र. | तालुके | लोकसंख्या | लागवडी खालील क्षेत्र (चौ.कि.मी.मध्ये) | पोषण घनता (दर चौ.कि.मी. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | तुमसर | २२६१०८ | ४१७.२३४ | ५४१ |
| २ | मोहाडी | १५०६११ | ४०७.३३५२ | ५६९ |
| ३ | भंडारा | २८००३० | ३६७.३६५ | ७६२ |
| ४ | साकोली | १३६८७९ | २३९.५३५ | ५७१ |
| ५ | लाखनी | १२८५४५ | २३६.८९३१ | ५४१ |
| ६ | पवनी | १५४५८८ | ४११.०७०३ | ३७६ |
| ७ | लाखांदूर | १२३५७३ | ४०६.६८०० | ३०३ |
| | **एकूण** | **१२००३३४** | **२४९.४५५७९** | **४८१.१** |

**स्त्रोत** - संशोधकाकडून संस्कारीत


वरील सारणीवरून भंडारा जिल्हयातील पोषण घनतेच्या अभ्यासानंतर विविध पिकाखालील उत्पादन व लोकसंख्या यामधील गुणोत्तरात बराच फरक दिसून येतो. ही पोषण घनता खालील तीन प्रकारात स्पष्ट केली आहे.

**अ. जास्त पोषण घनता -** भंडारा जिल्हयात २०११ या वर्षी सर्वाधिक पोषण घनता भंडारा तालुक्यात असुन ७६२ व्यक्ती प्रती चौ.कि.मी. एवढी आहे. भंडारा शहर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून उद्योगधंदे, बाजारपेठा, आरोग्य व्यवस्था, शैक्षणिक सोयी, कार्यालये व इतर अनेक सोयी सुविधांची उपलब्धता असल्याने लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक प्रमाणात झाले आहे. वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शेतीखालील क्षेत्र कमी होतांना दिसून येते.

सहाव्या क्रमांकाचे राष्ट्रीय महामार्ग याच शहरातून गेल्याने वाहतूकीच्या सोयी सहज दिसून येतात. याचा प्रभाव पोषण व आहारासाठी आवश्यक अन्नपदार्थ लोकांच्या जेवणात अधिक प्रमाणात दिसतात.

**ब. मध्यम पोषण घनता -** मध्यम स्वरूपाची पोषण घनता राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या साकोली तालुक्यात ५७१ प्रती चौ. कि.मी. व लाखनी आणि जिल्हयाच्या उत्तरेकडे असलेल्या तुमसर या दोन्ही तालुक्यात सारख्या प्रमाणात ५४१ व्यक्ती प्रती चौ.कि.मी. दिसून येते. या तालुक्यात लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून शेतीचे क्षेत्र कमी पाहायला मिळते. जिल्हातील मोहाडी व पवनी तालुक्यात अनुक्रमे ५६९ व ३७६ प्रती चौ.कि.मी. पोषण घनता आहे.

**क. कमी पोषण घनता -** अभ्यास क्षेत्रातील सर्वात कमी पोषण घनता लाखांदूर तालुक्यात ३०३ व्यक्ती प्रती चौ.कि.मी. एवढी असून या तालुक्यात लागवडीखालील क्षेत्र जास्त आहे. त्या तुलनेत लोकसंख्येचे प्रमाण कमी आहे. तालुक्याच्या ठिकाणापासून दूर असल्याने अनेक सोयी सहजपणे उपलब्ध होत नाही.



**निष्कर्ष व उपाययोजना -**

भंडारा जिल्हयातील पोषण घनतेच्या भौगोलिक अभ्यासात काही निष्कर्ष पुढे आली.

१) भंडारा जिल्हयातील पोषण घनतेत विविधता दिसून येते.

२) विशिष्ट प्रदेशात पोषण क्षमतेला स्पष्ट करणारी पोषण घनता असते. भंडारा तालुक्यात पोषण घनता अधिक आहे. पोषण आहाराची उपलब्धताही अधिक दिसून येते.

३) संतुलित व पोषक आहारावर पोषण शक्ती अवलंबून असते. जिल्हयाच्या तुमसर, मोहाडी, पवनी, साकोली व लाखनी तालुक्यात लोकसंख्येच्या तुलनेत लागवडीखालील क्षेत्र कमी दिसून येते.

४) पीक पध्दती व उत्पादन हे घटक पोषणाच्या उपलब्धतेला स्पष्ट करते.लोकसंख्या व लागवडीखालील क्षेत्र यातील फरकामुळे पोषण घनता लाखांदूर तालुक्यामध्ये सर्वात कमी दिसून येते.

५) सुदृढ लोकसंख्या व उत्तम आरोग्यासाठी जिल्हयात पीक पध्दतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

६) दैनंदिन आहारात आवश्यक पोषक पिकांचे क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे.

७) गुणोत्तरात वाढणाऱ्या लोकसंख्येचा भार शेतीवर अधिक पडतो. त्यासाठी पीकांची विविधता घेतल्यास जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भ**

- घारपूरे विठठल : कृषी भूगोल, जून २०००, पिंपळापूरे पब्लिकेशन, नागपूर.
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,भंडारा. वर्ष २०११,२०१७
- जिल्हा जनगणना पुस्तिका, भंडारा.२०,
- काळेले मीना(२०११) : पोषण आणि आहारशास्त्र, पिंपळापूरे पब्लिकेशन, नागपूर, पान क्र. ९ ते २९
- पंडित बापट सुरेखा : भारताचा भूगोल
- वर्मा प्रमिला, पांडे : आहार एवं पोषण विज्ञान, बिहार हिंदी ग्रंथ (२००६)अकादमी, पटना, पान क्र.११६, ७४